REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम" अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील हातगाव केंद्राची अध्ययन स्तर निश्चितीचा तुलनात्मक अभ्यास

श्री. ओमप्रकाश रतन थेटे (स. शि.)
संशोधक एम.ए , एम.एड , नेट , सेट (शिक्षणशास्त्र)जि. प. प्राथ. शाळा पिंपळगाव
प्र.दे. तालुका : - चाळीसगाव जिल्हा :- जळगाव.
डॉ. पंकजकुमार शांताराम नन्नवरे
मार्गदर्शक

## प्रस्तावना :

बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 हा 1 एप्रिल 2010 पासून भारतात लागू झाला **RTE**-2009 मधील प्रकरण 2 मध्ये कलम 3नुसार गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकाला मिळालेला आहे. त्यामुळे प्रत्येक बालकाला दर्जेदार शिक्षण देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. एका संस्थेचा वार्षिक शैक्षणिक सहास्थिती सर्वेक्षण अहवालात मागील 5 वर्षात 5वीच्या विद्यार्थ्यांचा वाचन क्षमतेमध्ये94% वरून 74% वर घसरण झाली. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी घेतलेल्या राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षण (SLAS) यामध्ये 5वीच्या विध्यार्थ्यांना भाषा विषयातील सरासरी संपादणूक 53% व गणित विषयातील सरासरी संपादणूक 51% असल्याचे आढळून आले आहे. यावरून राज्यात शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता हि चिंतेची आहे हे लक्षात येते.वाचन, लेखन, संख्याग्यान आणि संख्यांवरील क्रिया या क्षमतांची संपादणूक प्रभुत्व पातळीकडे जावी. एकही मूल अप्रगत राहू नये. मुले ज्या वर्गात शिकत आहेत त्या इयत्तेच्या क्षमतांचीही संपादणूक वेळोवेळी तपासून व मदत करून अप्रगत विध्यार्थ्यांचे प्रमाण कमी करणे या हेतूने 22 जून 2015 रोजी शैक्षणिक वर्ष 2015-2016 पासून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम सुरु झाला. यामध्ये सुरवातीचे 2 वर्ष प्रथम भाषा व गणित या दोन विषयांच्या चाचण्या घेण्यचे नियोजन होते. यामध्ये 2री ते 8वी पर्यंत पायाभूत चाचण्या घेण्यात येत. तसेच1ली ते 8वी साठी संकलित -1 व संकलित- 2 परीक्षेद्वारे विध्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली जाते. या कार्यक्रमांतर्गत दोन अहवाल संकलित केले जातात.

(अ) निष्पत्ती अहवाल – यात प्रत्येक चाचणीनंतर विध्यार्थ्याचे गुण शिक्षकाने सरल प्रणालीद्वारे संगणकात भरणे त्यावर SCERT ने आज्ञावली देवून खालील माहिती मिळते :-

- ❖ चाचणीत सहभागी विद्यार्थी संख्या
- ❖ 50%पेक्षा कमी गुण मिळालेली विद्यार्थी संख्या
- ❖ गुणवत्ता श्रेणीनुसार राज्यातील शाळांची संख्या
- ❖ गुणवत्ता श्रेणीनुसार केंद्र व गटांची संख्या
- ❖ अप्रगत विद्यार्थी विरहित शाळा संख्या



(ब) प्रक्रिया अहवाल – हा मासिक स्वरूपाचा अहवाल असून 1 महिन्याच्या आत शासनास सादर करावा लागतो .

हे सर्व करत असताना प्रगत शाळा, डीजीटल शाळा, ABL शाळा , ISO 9000 शाळा आदींमध्ये लक्षणीय वाढ झाली. शिक्षक व अधिकारी प्रशिक्षण मागणीत वाढ झाली समाज सहभाग वाढून शाळेसाठी भरपूर आर्थिक मदत मिळू लागली तसेच प्रोजेक्टर,ई-लर्निंग सेट सेवाभावी संस्था कडून मिळू लागले. तसेच अनेक कंपन्या आपल्या CCR मधून शाळांसाठी मदत देऊ लागल्या. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमामुळे राज्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ झाली. परंतु प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाचे 100% उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अध्ययन स्तर विकसन कार्यक्रम राबिवण्यात येत आहे. याबाबत सविस्तर माहिती पुढील प्रमाणे :-

## अध्ययन स्तर विकसन कार्यक्रम

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत प्राथमिक स्तरावर भाषा व गणित मुलभूत अध्ययन स्तर विकसन कार्यक्रम सन 2017-18मध्ये इयत्ता 1ली ते 5वी साठी जिल्हा शैक्षणिक सातत्यपुर्ण ( मा. केंद्रप्रमुख सो. अध्ययन स्तर निश्चिती करतांना )



व्यावसायिक विकास संस्था, जळगाव आणि प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद, जळगाव यांच्याप्रयत्नाने राबिवण्यात आला.अध्ययन स्तर निश्चिती मध्ये भाषा विषयात वाचन आणि भाषण कौशल्यांचे मूल्यमापन करण्यात आले.तसेच गणित विषयात अध्ययन स्तर निश्चित करताना इयत्ता निहाय किमान अपेक्षित क्रियांचे मूल्यमापन करण्यात आले. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत जळगाव जिल्ह्यातीलचाळीसगाव तालुक्यामधील प्राथमिक स्तरावरील भाषा व गणित मुलभूत अध्ययनस्तर विकसन कार्यक्रम सुरु करण्यात आला. यामध्ये भाषा विषयात प्रारंभिक, अक्षर, शब्द, उतारा, गोष्ट/कथा आणि समजपुर्वक वाचन यांचा अंतर्भाव करण्यात आला . तर गणित मध्ये प्रारंभिक,1 अंकी संख्यातून (1 ते 9), 2 अंकी संख्यातून (10 ते 99)ची बेरीज, वजाबाकी,गुणाकार,भागाकार स्तर तयार करण्यात आले. फेब्रुवारी 2017 मध्ये अध्ययन स्तर निश्चित करण्यासाठी वरिष्ठ पातळीवरून क्षेत्रीय अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी फेब्रुवारी 2018 मध्ये शाळेला प्रथम भेट देवून विध्यार्थ्यांचा अध्ययन स्तर निश्चित करण्यात आला.त्यामुळे प्रत्येक विध्यार्थ्याचा भाषा व गणित विषयाचा अध्ययन स्तर समजला.

प्रत्येक विद्यार्थ्याचा अध्ययन स्तर निश्चित निश्चित झाल्यामुळे त्याला अध्ययन पूरक कृती कार्यक्रम आराखडातयार करण्यात आला . या कृती कार्यक्रमामध्ये कृतीची उद्दिष्टे, अध्ययन कृती, साहित्य कार्ड

क्रमांक, सुलभक, कालावधी व अध्ययन निष्पत्ती या मुद्यांचा समावेश करण्यात आला. प्रत्येक विध्यार्थ्याला पुढील प्रभुत्व पातळीवर वा स्तरावर आणण्यासाठी अध्ययन समृद्धी कार्यक्रमांतर्गत मराठी वाचन पेटी व गणितातील मुलभूत संबोध स्पष्ट होण्यासाठी गणित पेटीचा वापर कसा करावा यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.प्रशिक्षणात उद्दिष्टे कशी निश्चित करावी, त्यास अनुसरुन अध्ययन साहित्यचा वापर करून अध्ययन अनुभव कसे द्यावे तसेच प्रत्यक्ष कृतियुक्त अध्ययन अनुभव देवून अध्ययन निष्पत्ती तपासणे यावर परिपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. कृतीच्या वरील मुद्यांवर आधारित विद्यार्थ्यांचा मराठी व गणित पेटीतील साहित्याच्या आधारे अध्ययन स्तर विकसन कार्यक्रम राबिवण्यात आला. यानंतर एप्रिल 2018 क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी शाळेला पुनर्भेट देवून विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तर विकसन कार्यक्रमाची पडताळणी केली.

अशाप्रकारे सन 2017-18 मध्ये अध्ययन स्तर निश्चिती प्रथम भेट व पुनर्भेट कार्यक्रमात इयत्ता 1ली ते 5वी पर्यंतच्या विध्यार्थ्यांचे भाषा व गणितातील गुणांच्या आधारे तक्ता क्रमांक 1 ते 4 मध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे विश्लेषण केले आहे.या प्रत्येक टप्प्यावरील चाळीसगाव तालुक्यामधील हातगाव केंद्रातील सर्व शाळांची इयत्ता 1ली ते 5वी पर्यंतच्या विध्यार्थ्यांचे भाषा व गणिताचे संकलन तक्ते उपलब्ध करून त्याचे विश्लेषण करण्यात येवून पुढील निष्कर्ष काढण्यात आले.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम

भाषा व गणित अध्ययन स्तर निश्चिती टप्पा क्र.1

केंद्र - संकलन प्रपत्र

समूह साधन केंद्र हातगाव तालुका चाळीसगाव जिल्हा जळगाव


दिनांक :- 23/02/2018

भाषा

( तक्ता क्र.1 )

| अ.क्र | वर्ग | पट संख्या | | | उपस्थिती | | | वाचन | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | प्रारंभिक | अक्षर | शब्द | उतारा | गोष्ट / कथा | समज पुर्वक वाचन |
| 1 | 1ली | 116 | 121 | 237 | 64 | 61 | 125 | 32 | 49 | 36 | 07 | 00 | 01 |
| 2 | 2री | 123 | 114 | 237 | 75 | 70 | 145 | 24 | 49 | 35 | 27 | 10 | 00 |
| 3 | 3री | 138 | 105 | 243 | 95 | 54 | 149 | 13 | 22 | 38 | 52 | 21 | 03 |
| 4 | 4थी | 143 | 120 | 263 | 80 | 66 | 146 | 12 | 19 | 36 | 18 | 39 | 22 |
| 5 | 5वी | 93 | 90 | 183 | 62 | 46 | 108 | 09 | 08 | 33 | 26 | 16 | 16 |
| | एकूण | 613 | 550 | 1163 | 376 | 297 | 673 | 90 | 147 | 178 | 130 | 86 | 42 |

## अर्थानिर्वचन व विश्लेषण




### निष्कर्ष :-


- ❖ भाषा विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 14% विद्यार्थी प्रारंभिक स्तरावर आहे.
- ❖ भाषा विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 22% विद्यार्थी अक्षर वाचन स्तरावर आहे.
- ❖ भाषा विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 27% विद्यार्थी शब्द वाचन स्तरावर आहे.
- ❖ भाषा विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 19% विद्यार्थी उतारावाचन स्तरावर आहे.
- ❖ भाषा विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 12% विद्यार्थी गोष्ट/ कथावाचन स्तरावर आहे.
- ❖ भाषा विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 6% विद्यार्थी समजपुर्वक वाचन म्हणजेच अंतिम स्तरापर्यंत पोहचलेले आहे.

### गणित

| अ. क्र | वर्ग | पट संख्या | | | उपस्थिती | | | गणित | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | प्रारंभिक | अंक ओळख १ ते ९ | अंक ओळख १० ते ९९ | बेरीज | वजाबाकी | गुणाकार | भागाकार |
| 1 | 1ली | 116 | 121 | 237 | 64 | 61 | 125 | 28 | 75 | 13 | 09 | - | - | - |
| 2 | 2री | 123 | 114 | 237 | 75 | 70 | 145 | 16 | 60 | 26 | 25 | 18 | - | - |
| 3 | 3री | 138 | 105 | 243 | **95** | 54 | 149 | 03 | 27 | 25 | 35 | 41 | 15 | 03 |
| 4 | 4थी | 143 | 120 | 263 | 80 | 66 | 146 | 04 | 15 | 32 | 31 | 25 | 30 | 09 |
| 5 | 5वी | 93 | 90 | 183 | 62 | 46 | 108 | 07 | 02 | 16 | 23 | 27 | 23 | 10 |
| | **एकूण** | 613 | 550 | 1163 | 376 | 297 | 673 | 58 | 179 | 112 | 123 | 111 | 68 | 22 |

( तक्ता क्र.2 )

## अर्थानिर्वचन व विश्लेषण




### निष्कर्ष :-

- गणित विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 9% विद्यार्थी प्रारंभिक स्तरावर आहे.
- गणित विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 27% विद्यार्थी अंक ओळख 1 ते 9 स्तरावर आहे.
- गणित विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 17% विद्यार्थी अंक ओळख 10 ते 99 स्तरावर आहे.
- गणित विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 18% विद्यार्थी बेरीज स्तरावर आहे.
- गणित विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 16% विद्यार्थी वजाबाकी स्तरावर आहे.
- गणित विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 10% विद्यार्थी गुणाकार स्तरावर आहे.
- गणित विषयामध्ये इयत्ता 1 ली ते 5 वी चे सरासरी03% विद्यार्थी अपेक्षित क्षमता म्हणजेच अंतिम स्तरापर्यंत पोहचलेले आहे.

### प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम
### भाषा व गणित अध्ययन स्तर निश्चिती टप्पा क्र.2

केंद्र - संकलन प्रपत्र

समूह साधन केंद्र हातगाव तालुका चाळीसगाव जिल्हा जळगाव


दिनांक :- 06/04/2018

भाषा

| अ. क्र | वर्ग | पट संख्या | | | उपस्थिती | | | वाचन | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | प्रारंभिक | अक्षर | शब्द | उतारा | गोष्ट / कथा | समजपुर्वक वाचन |
| 1 | 1ली | 116 | 122 | 238 | 73 | 69 | 142 | 19 | 33 | 74 | 09 | 00 | 07 |
| 2 | 2री | 123 | 114 | 237 | 93 | 90 | 183 | 13 | 63 | 46 | 27 | 23 | 11 |
| 3 | 3री | 138 | 106 | 244 | 105 | 65 | 170 | 07 | 21 | 51 | 52 | 17 | 22 |
| 4 | 4थी | 143 | 120 | 263 | 90 | 77 | 167 | 11 | 20 | 35 | 27 | 17 | 57 |
| 5 | 5वी | 93 | 90 | 183 | 74 | 66 | 140 | 2 | 6 | 16 | 48 | 26 | 42 |
| | एकूण | 613 | 552 | 1165 | 435 | 367 | 802 | 52 | 143 | 222 | 163 | 83 | 139 |

( तक्ता क्र.3 )

अर्थानिर्वचन व विश्लेषण




निष्कर्ष :-


- भाषा विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 7% विद्यार्थी प्रारंभिक स्तरावर आहे.
- भाषा विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी18% विद्यार्थी अक्षर वाचन स्तरावर आहे.
- भाषा विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 28% विद्यार्थी शब्द वाचन स्तरावर आहे.
- भाषा विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी20% विद्यार्थी उतारावाचन स्तरावर आहे.
- भाषा विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 10% विद्यार्थी गोष्ट/ कथावाचन स्तरावर आहे.
- भाषा विषयामध्ये इयत्ता 1 ली ते 5 वी चे सरासरी17% विद्यार्थी समजपुर्वक वाचन म्हणजेच अंतिम स्तरापर्यंत पोहचलेले आहे.

## गणित

| अ.क्र | वर्ग | पट संख्या | | | उपस्थिती | | | गणित | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | प्रारंभिक | अंक ओळख १ ते ९ | अंक ओळख १० ते ९९ | बेरीज | वजाबाकी | गुणाकार | भागाकार |
| 1 | 1ली | 116 | 122 | 238 | 73 | 69 | 142 | 10 | 45 | 19 | 68 | 00 | 00 | 00 |
| 2 | 2री | 123 | 114 | 237 | 93 | 90 | 183 | 06 | 77 | 18 | 30 | 52 | 00 | 00 |
| 3 | 3री | 138 | 106 | 244 | 105 | 65 | 170 | 02 | 22 | 23 | 30 | 42 | 42 | 09 |
| 4 | 4थी | 143 | 120 | 263 | 90 | 77 | 167 | 05 | 25 | 20 | 31 | 21 | 25 | 40 |
| 5 | 5वी | 93 | 90 | 183 | 74 | 66 | 140 | 01 | 03 | 06 | 30 | 27 | 31 | 42 |
| | एकूण | 613 | 552 | 1165 | 435 | 367 | 802 | 24 | 172 | 86 | 189 | 142 | 98 | 91 |

( तक्ता क्र.4 )

### अर्थानिर्वचन व विश्लेषण




### निष्कर्ष :-

- गणित विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी 3% विद्यार्थी प्रारंभिक स्तरावर आहे.
- गणित विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी21% विद्यार्थी अंक ओळख 1 ते 9 स्तरावर आहे.
- गणित विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी11% विद्यार्थी अंक ओळख 10 ते 99 स्तरावर आहे.
- गणित विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी24% विद्यार्थी बेरीज स्तरावर आहे.
- गणित विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी18% विद्यार्थी वजाबाकी स्तरावर आहे.
- गणित विषयामध्ये इयत्ता 1ली ते 5वी चे सरासरी12% विद्यार्थी गुणाकार स्तरावर आहे.

- गणित विषयामध्ये इयत्ता 1 ली ते 5 वी चे सरासरी11% विद्यार्थी अपेक्षित क्षमता म्हणजेच अंतिम स्तरापर्यंत पोहचलेले आहे.

## सारांश :-

अशा प्रकारे जळगाव जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये अध्ययन स्तर निश्चिती कार्यक्रम सन 2017-18 मध्ये राबविन्यात आला. यामध्ये प्रथम भेट दिनांक **23/02/2018** नुसार हातगावकेंद्रातील भाषा विषयातील 1ली ते 5वी चे सरासरी 14% विद्यार्थी प्रारंभिक स्तरावर असल्याचे आढळून आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना कृती कर्यक्रम देवून त्यांच्या गुणात्मक पातळीत सुधारणा करण्यात आली. दिनांक **06/04/2018**च्या पुनर्भेटी नुसार फक्त 7% विद्यार्थी हे प्रारंभिक स्तरावर असल्याचे आढळून आले. म्हणजेच विद्यार्थ्यांच्या अपेक्षित क्षमतेत वाढ होण्यास मदत झाली. तसेच दिनांक **23/02/2018** नुसार फक्त 6% विद्यार्थी हे अंतिम स्तरापर्यंत पोहचले आहे. तर दिनांक**06/04/2018** नुसार 17% विद्यार्थी हे अंतिम स्तरापर्यंत पोहचले आहे. म्हणजेच ज्या कार्यक्रमामुळे गुणवत्तेत वाढ होत आहे असे लक्षात येते .

वरील प्रमाणेच प्रथम भेट दिनांक **23/02/2018** नुसार हातगावकेंद्रातील गणित विषयातील 1ली ते 5वी चे सरासरी09% विद्यार्थी प्रारंभिक स्तरावर असल्याचे आढळून आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना कृती कर्यक्रम देवून त्यांच्या गुणात्मक पातळीत सुधारणा करण्यात आली. दिनांक **06/04/2018**च्या पुनर्भेटी नुसार फक्त 03% विद्यार्थी हे प्रारंभिक स्तरावर असल्याचे आढळून आले. म्हणजेच विद्यार्थ्यांच्या अपेक्षित क्षमतेत वाढ होण्यास मदत झाली. तसेच दिनांक **23/02/2018** नुसार फक्त 03% विद्यार्थी हे अंतिम स्तरापर्यंत पोहचले आहे. तर दिनांक**06/04/2018** नुसार 11% विद्यार्थी हे अंतिम स्तरापर्यंत पोहचले आहे. म्हणजेच ज्या कार्यक्रमामुळे गुणवत्तेत वाढ होत आहे असे लक्षात येते .

## संदर्भ सूची :-


- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय 22 जुन 2015
- जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय 9 जानेवारी 2017
- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय 17 जानेवारी 2017
- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय 21 जून 2017
- बालशिक्षण हस्तपुस्तिका – वाचन, लेखन, गणनसिद्धता विद्या प्राधिकरण पुणे-30
- अध्ययन स्तर विकसन शिक्षक मित्र हस्तीपुस्तिका 2017-18
- अध्ययन अनुभव कृतीपुस्तिका सन 2016-17 जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था जळगाव





**श्री. ओमप्रकाश रतन थेटे (स. शि.)**
**संशोधक एम.ए , एम.एड , नेट , सेट (शिक्षणशास्त्र)जि. प. प्राथ. शाळा पिंपळगाव**
**प्र.दे. तालुका : - चाळीसगाव जिल्हा :- जळगाव.**